महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसटीसी-३५९०/[२२४५]विशि-२
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २५ जाने. १९९०.

प्रति,

कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे.

विषय: सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून अध्यापक महाविद्यालये उघडण्यास परवानगी.

महोदय,

सन १९९०-९१ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करून आदिवासी सेवासहाय्यक संस्था, धुळे या संस्थेच्या १९९०-९१ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर पुणे विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|
| नवापूर, जि. धुळे | अध्यापक महाविद्यालय |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे :-

१. सदर महाविद्यालयास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यांत येत आहे.

२. संस्थेने विद्यापीठाकडे ३० नोव्हें. १९८९ पूर्वी नवीन अध्यापक महाविद्यालय सुरू करण्याकरिता अर्ज केलेला असावा. तसा अर्ज न केल्यास विद्यापीठाकडे इतर कोणत्याही संस्थाकडून सदर ठिकाणासाठी अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यासाठी विद्यापीठास अर्ज प्राप्त झालेला नसावा.

[कृ.मा.प.]

...२/...

३. सदर महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ८० असेल व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यास सदर महाविद्यालये रु.२५००/- शिक्षणशुल्क आकारतील. विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्तींचे सदर अध्यापक महाविद्यालयातून पालन करण्यांत यावे.

४. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,

[ द. रा. माळी ]

सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] शिक्षण संचालक [उच्च शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे

२] प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान ]
नाशिक विभाग, नाशिक.

३] सचिव, आदिवासी सेवा सहाय्यक संस्था, धुळे

४] निवड नस्ती.

क्र. एसटीसी ३५९०[२२४५]विशि-२,
शिक्षण व सेवा योजन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक १२ जुलै १९९०.

प्रति,

कुलसचिव, पुणे विद्यापीठ,

पुणे.

विषय: आदिवासी सेवा सहाय्यक संस्था, धुळे
५० जादा जागा आदिवासींसाठी
कायम स्वरूपात ठेवणेबाबत.

महोदय,

सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अध्यापक महाविद्यालये मंजूर करण्याबाबतचे शासनाचे समक्रमांकाचे दिनांक २५ जानेवारी १९९० चे पत्र कृपया पहावे.

२. उपरोक्त पत्रान्वये आदिवासी सेवा सहाय्यक संस्था, धुळे या संस्थेस १९९०-९१ पासून नवीन अध्यापक महाविद्यालय सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. याबाबत आपणास असे कळविण्यात येते की सदर महाविद्यालयास आदिवासींसाठी ५० जादा जागा कायम स्वरूपात, एक खास बाब म्हणून देण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. विद्यापीठाने/ शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती यांचे सदर अध्यापक महाविद्यालयाकडून पालन करण्यात यावे.

आपला विश्वासू,

[ शरद परब ]
कक्ष अधिकारी.

प्रत,

१] शिक्षण संचालक[उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे,
२] प्रशासन अधिकारी उच्च शिक्षण अनुदान पुणे विभाग, पुणे,
३] सचिव, आदिवासी सेवा सहाय्यक संस्था, धुळे,
४] निवड नस्ती.

०२५६१ - २५।२।१९

महाराष्ट्र शासन

क्रमांकः-एनजीसी २००४/ (२०३ /०४)मशि-३
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांकः- १३ जुलै, २००४

प्रति,
कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव

विषयः- **श्री.सु.हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, नंदुरबार बी.एड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी संख्येत वाढ करणेबाबत.**

संदर्भः- राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांचे क्रमांकः WRC/२-३२/६०/११३०३३/२००४/३९१९, दि. ११.६.२००४.

महोदय,

आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था, नवापूर , जि. धुळे संचलित श्री.सु.हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर या महाविद्यालयास राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांचे सुधारित मानकानुसार महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या १३० वरुन २०० इतकी वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

(अं. अ. कारखानीस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव
प्राचार्य, आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था, नवापूर , जि. धुळे संचलित श्री.सु.हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर
निवड नस्ती - मशि-३

Permission to B.Ed.College

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी नवापूर येथील
शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे संलग्नीकरणाबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक:एसटीसी १०९२/ ५६०१/ विशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक:- ८/९२/ १९९२

संदर्भ:- १] शासकीय पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग
क्रमांक:एसटीसी ३५९०/[२२४५]विशि-२,
दि. २५. १. ९०

२] कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे
पत्र क्रमांक:सीएडी ७९५/दिनांक ४. ६. ९०

शासन निर्णय:- विद्यापीठ अधिनियम १९८९ च्या ५३ च्या कलमाच्या [७] व [८] या उपकलमान्वये मिळालेल्या अधिकारानुसार उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी नवापूर, जि. धुळे येथील आदिवासी सेवा सहाय्यक संस्था धुळेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाला जून १९९० पासून २ वर्षाकरिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास कायम विना अनुदान तत्वावर व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांनी विहित केलेल्या अटीच्या पुर्ततेच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील संलग्नीकरणाबाबत जास्तीत जास्त किती विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल याबाबत विद्यापीठाने घातलेली मर्यादा आणि विद्यापीठाने घातलेल्या इतर अटी यांचे महाविद्यालयांतून पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ दे. ह. तामोरे ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:
१] कुलसचिव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
२] कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
३] शिक्षण संचालक[उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे
४] प्रशासन अधिकारी[उच्च शिक्षण अनुदान], नाशिक विभाग, नाशिक
५] प्राचार्य, आदिवासी सेवा सहाय्यक संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, जि. धुळे
६] निवड फाईल, विशि-२, विशि-२ अ

पारसेकर २७. ११

आदिवासी सेवा सहाय्यक संस्थेचे
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर
आवक क्र. 517
दिनांक 22/12/92
स्वाक्षरी

प्राचार्य
श्री. बु. हि. नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नवापूर.